NOTICE FOR SALE OF ASSETS

UNDER INSOLVENCY AND BANKRUPTCY CODE, 2016

Unimetal Castings Limited (In Liquidation)

Liquidator: IP Pankaj Sham Joshi, 9 Sudarsan CHS, Mahant Road, Vile Parle East, Mumbai-400057.

NOTICE is hereby given to the public in general that, in accordance with Regulation 33(1) read with Regulation 12(3) of the Insolvency and Bankruptcy Board of India (Liquidation Process) Regulations, 2016, the following properties of Unimetal Castings Limited (In Liquidation) are being offered for sale via an online E-Auction process, conducted through the E-Auction service provider **"Baanknet Listing and Auction Portal"** (website at https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi). The sale shall be conducted on an **"as is where is", "as is what is", "whatever there is"** and **"without recourse"** basis:

Brief Description of Assets for Sale	Reserve Price (INR)	EMD
Land & Building at Sector F, Parvati Co-operative Industrial Estate, Sangli Road, Village, Ichalkaranji, Kolhapur 416415 bearing Plot No. 82,83,84 & 85, Phase – IV, Gat No. 61 to 63	**91,28,465.00**	**9,12,846.00**

Note 1: The Sale Process Memorandum containing the bid forms and detailed terms & conditions of the E-Auction process can be downloaded from https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi or requested via email at pjoshi.ip@gmail.com.

The timelines for the e-auction process in accordance with the Insolvency and Bankruptcy Board of India (Liquidation Process) Regulations, 2016 (as amended upto 22.09.2026) are as given below:

Due Diligence and Inspection of assets under auction	23.10.2026 to 01.11.2026 11.00 a.m. to 05.00 p.m. (IST)
Last date for payment of Earnest Money Deposit by eligible bidder through the E-auction Platform	**02.11.2026**
Date and time of E-Auction	**04.11.2026 from 12:00 Noon to 13:00 p.m.**
Declaration of Highest Bidder	**05.11.2026**

The prospective bidders shall mandatorily submit an undertaking that they do not suffer from any ineligibility u/s 29 A of the Insolvency and Bankruptcy Code, 2016, to the extent applicable and if found ineligible at any stage, the earnest money deposited shall be forfeited.

For inspection of assets on or before the designated date for inspection, please contact the undersigned at mobile: +91 9820436268 and/or email ID: pjoshi.ip@gmail.com. For further clarifications about E-Auction of assets please contact at Baanknet +91 82912 20220 or email: support.baanknet@psballiance.com.

Sd/-
Pankaj Sham Joshi
Liquidator Unimetal Castings Limited (In Liquidation)
Reg. No. IBBI/IPA-002/IP-N00507/20172018/11556
AA2/11556/02/311226/204161 valid upto 31.12.2026

Date : 23.10.2026
Place: Mumbai


सिरसेत स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरचा स्फोट

सुदैवाने जीवितहानी टळली; घराची पडझड : प्रापंचिक साहित्याचे नुकसान

कौलव : पुढारी वृत्तसेवा

सिरसे (ता. राधानगरी) येथील काशिनाथ एकनाथ सांगळे यांच्या घरातील स्वयंपाकाच्या नवीन भरून आणलेल्या गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट होऊन सुमारे दहा लाख रुपयांचे नुकसान झाले. तसेच घराची मोठ्या प्रमाणात पडझड झाली असून, प्रापंचिक साहित्याचे नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झाली नाही.

सांगळे यांचे कुटुंब गरीब असून, मोलमजुरी करून ते उदरनिर्वाह करतात. त्यांनी शासकीय योजनेतून घरकुल बांधले होते. गुरुवारी रात्री नऊच्या सुमारास घरातील गॅस सिलिंडरच्या पाईपने अचानक पेट घेतल्याने त्यांनी पाईप सोडण्याचा प्रयत्न केला; मात्र आगीचा भडका उडाला. त्यामुळे भीतीने सर्व कुटुंबीय घरातून बाहेर पळून गेले. मात्र, सिलिंडरने पेट घेतल्याने कानठळ्या बसवणारा मोठा स्फोट झाला. स्फोटाचा आवाज सुमारे दोन किलोमीटरपर्यंत गेला.




सिरसे : येथे गॅस सिलिंडरच्या स्फोटामुळे घराची झालेली पडझड व प्रापंचिक साहित्याचे झालेले नुकसान.

या दुर्घटनेत घराची मोठ्या प्रमाणात पडझड झाली असून, छत उद्ध्वस्त झाले आहे. त्याचबरोबर भांडी व प्रापंचिक साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. शेजारच्या दोन घरांचीही मोठी पडझड झाली आहे. केवळ दैव बलवत्तर म्हणून जीवितहानी झाली नाही. स्फोटामुळे काही काळ गावातील विद्युत पुरवठाही खंडित झाला होता. या स्फोटामुळे भीतीचे वातावरण पसरले आहे.

वारणा श्रीखंडाची दसऱ्याला ४५० मे. टन विक्रमी विक्री

आ. डॉ. विनय कोरे यांची माहिती

वारणानगर : पुढारी वृत्तसेवा

वारणा दूध संघाने दसरा सणाला 'वारणा श्रीखंड'ची तब्बल ४५० मेट्रिक टन श्रीखंडाची विक्री करत नवा विक्रम प्रस्थापित केला असल्याची माहिती वारणा समूहाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे यांनी दिली. या विक्रमी विक्रीमुळे वारणा ब्रँडवरील ग्राहकांचा दृढ विश्वास आणि वारणा उत्पादनांची वाढती लोकप्रियता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

डॉ. कोरे म्हणाले, दसरा सणाला देशात वारणा दूध संघाच्या दर्जेदार, स्वादिष्ट व गुणवत्तापूर्ण श्रीखंडाला ग्राहकांकडून मोठी पसंती मिळाली. ग्राहकांना श्रीखंड उपलब्ध करून देण्यासाठी संघाने नियोजनबद्ध व्यवस्था राबविली. उत्पादनातील सातत्य, स्वच्छता आणि ग्राहकांच्या विश्वासाला प्राधान्य देण्याची परंपरा यामुळे वारणा श्रीखंडाने बाजारपेठेत वेगळे स्थान निर्माण केले आहे.

वारणा श्रीखंडाची दसऱ्याला ४५० मे. टन विक्रमी विक्रीमध्ये दूध उत्पादक शेतकरी, संघाचे अधिकारी व कर्मचारी, वितरक, विक्रेते आणि ग्राहकांचे मोलाचे योगदान आहे.

वारणा दूध संघाने श्रीखंड विक्रीत मिळविलेला हा विक्रमी टप्पा म्हणजे केवळ विक्रीतील वाढ नसून ग्राहकांनी वारणा ब्रँडवर व्यक्त केलेल्या विश्वासाचे प्रतीक असून, दसऱ्याच्या गोडव्याला वारणा श्रीखंडाची साथ आणि ग्राहकांच्या विश्वासातून विक्रीचा नवा विक्रम, हीच वारणा दूध संघाच्या यशस्वी वाटचालीची ओळख ठरली आहे. यावेळी वारणा दूध संघाचे अध्यक्ष एच. आर. जाधव, उपाध्यक्ष अ‍ॅड. एन. आर. पाटील, कार्यकारी संचालक सुधीर कामेरीकर व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

डॉ. डी. वाय. पाटील यांना ९१ व्या जयंतीनिमित्त अभिवादन

डॉ. संजय डी. पाटील, पृथ्वीराज पाटील यांच्याकडून आदरांजली

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिक्षण, आरोग्य, कृषी आणि सामाजिक क्षेत्रात आपल्या कार्याचा अमिट ठसा उमटवणारे पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या ९१ व्या जयंतीनिमित्त डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ आणि डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे येथे प्रतिमापूजन करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ येथे झालेल्या कार्यक्रमात कुलपती तथा ग्रुपचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील आणि विश्वस्त पृथ्वीराज संजय पाटील यांनी डॉ. डी. वाय. पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले, परीक्षा नियंत्रक अभय जोशी, साळोखेनगरचे कॅम्पस डायरेक्टर डॉ. अभिजित माने, सी. एच. आर. ओ. श्रीलेखा साटम व विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक आणि कर्मचारी उपस्थित होते.



कोल्हापूर : पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या ९१ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना कुलपती डॉ. संजय डी. पाटील. समवेत विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा आदी.

डी. वाय. पाटील एज्युकेशनल सिटी तळसंदेच्या वतीने डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ येथे डॉ. डी. वाय. पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून आदरांजली वाहण्यात आली. कुलगुरू डॉ. अनिलकुमार गुप्ता, कुलसचिव डॉ. जयेंद्र खोत, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एस. बी. पाटील, डॉ. एस. आर. पावसकर, प्रा. डी. एन. शेलार उपस्थित होते.

कोल्हापुरात उद्यापासून दोन दिवस 'केएमए कॉन २०२६'

देशभरातील ६०० डॉक्टर होणार सहभागी; विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

कोल्हापूर मेडिकल असोसिएशन, इंडियन मेडिकल असोसिएशन शाखेच्या वतीने २४ व २५ ऑक्टोबर रोजी हॉटेल सयाजी येथे 'केएमए कॉन २०२६' या दोनदिवसीय वैद्यकीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. 'अवघा रंग एक' या ब्रीदवाक्याखाली होणाऱ्या परिषदेत देशभरातील सुमारे ७०० डॉक्टर सहभागी होणार असल्याची माहिती मेडिकल असो.चे अध्यक्ष डॉ. ए. बी. पाटील, डॉ. अर्जुन आडनाईक यांनी पत्रकार परिषदेत दिली. परिषदेचे उद्घाटन शनिवारी सायंकाळी साडेसात वाजता बंगळूर येथील अतिरिक्त पोलिस महासंचालक हेमंत निंबाळकर आणि सोलापूरचे हृदयरोगतज्ज्ञ डॉ. गुरुनाथ परळे यांच्या हस्ते होईल. मुंबईतील डॉ. रॉय पाटणकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

दरम्यान, रविवारी दुपारी १२ वाजता ज्येष्ठ पोटविकारतज्ज्ञ डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांना 'डॉ. अतुल जोगळेकर जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती वैद्यकीय परिषदेच्या अध्यक्षा डॉ. गौरी साईप्रसाद व उपाध्यक्ष डॉ. संदीप पाटील यांनी दिली.

सायंकाळच्या सत्रात मुंबईचे अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. अनंत जोशी 'स्पोर्टस् मेडिसिन आणि इजामुक्त व्यायाम' तर योगतज्ज्ञ रूपा चक्रवर्ती 'योग' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) कार्यशाळेसह विविध व्याख्याने होतील. गर्भावस्थेपासून बालपणापर्यंतची काळजी, संधिवात, मधुमेहातील आहार, यकृताचे आजार, रक्तविकार, मेंदूविकार, स्तंभनदोष आणि चष्म्यापासून मुक्ती अशा विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. पत्रकार परिषदेला खजिनदार डॉ. प्रवीण नाईक, डॉ. अश्विनी पाटील, डॉ. गावडे आदींसह अन्य डॉक्टर उपस्थित होते.



बँक ऑफ इंडिया कोल्हापूर झोनचा व्यवसाय २२,५६७ कोटींवर

कोल्हापूर : बँक ऑफ इंडियाच्या कोल्हापूर झोनअंतर्गत कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांतील ९२ शाखांच्या माध्यमातून झोनचा एकूण व्यवसाय २२,५६७ कोटी रुपयांवर पोहोचल्याची माहिती बँक ऑफ इंडियाचे कार्यकारी संचालक सुब्रत कुमार यांनी दिली.

कोल्हापूर झोनच्या शाखा व्यवस्थापक परिषदेत ते मार्गदर्शन करत होते. सकारात्मक दृष्टिकोन, संघभावना आणि नियोजनबद्ध प्रयत्नांच्या माध्यमातून ग्राहकसेवा आणि आर्थिक समावेशनाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

या परिषदेत ३० सप्टेंबर २०२६ अखेरच्या एकूण ठेवी व कर्जांचा आढावा घेण्यात आला. तसेच महाराष्ट्र शासनाच्या कर्जमाफी योजना २०२६ अंतर्गत कोल्हापूर झोनमधील ५,६३७ कर्जखात्यांमध्ये ६८.०१ कोटी रुपयांची कर्जमाफीची रक्कम जमा झाल्याचे सांगण्यात आले. यासोबतच स्थानिक कृषी, फाउंड्री, वस्त्रोद्योग व प्रक्रिया उद्योगांच्या विकासासाठी योग्य कर्जपुरवठा करण्यावर भर देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

कडवेपैकी लाळेवाडी येथील स्मशानभूमीत अघोरी प्रकार

मलकापूर : पुढारी वृत्तसेवा

शाहूवाडी तालुक्यातील कडवे पैकी लाळेवाडी येथील स्मशानभूमीत अघोरी प्रकार उघडकीस आला आहे. अग्नी दिलेल्या प्रेताच्या राखेजवळ अर्धवट कापलेली पपई, लिंबू, गुलाल आणि एक अनोळखी फोटो आढळल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.



अंधश्रद्धेतून किंवा करणीच्या उद्देशाने हा प्रकार घडल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही मलकापूर आणि ससेगाव परिसरातील स्मशानभूमींमध्ये अशाच प्रकारच्या अघोरी घटना घडल्या आहेत. अशा अंधश्रद्धा पसरवणाऱ्या समाजकंटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

कोल्हापुरात उद्यापासून 'गेहेना'चे प्रीमियम दागिने प्रदर्शन

कोल्हापूर : पारंपरिक आणि आधुनिक दागिन्यांची रेलचेल असलेल्या 'गेहेना' या भव्य प्रीमियम दागिने प्रदर्शनाचे आयोजन कोल्हापुरातील सयाजी हॉटेल येथे शनिवार (दि. २४) आणि रविवार (दि. २५) रोजी सकाळी १० ते रात्री ८.३० या वेळेत करण्यात आले आहे.



या विशेष प्रदर्शनामध्ये राज्यातील नामवंत ज्वेलर्स सहभागी होत असून, मिरजेचे अनुज ज्वेलर्स येथे हिऱ्यांचे दागिने, पोलकी ज्वेलरी तसेच मौल्यवान रंगीत रत्नांनी सजलेले देखणे डायमंड दागिने घेऊन येत आहेत. त्यांची प्रत्येक निर्मिती परंपरेचा, कलात्मकतेचा आणि चिरंतन सौंदर्याचा प्रत्यय घडवणारी आहे.

पुण्याचे ओसवाल ज्वेलर्स सोने आणि चांदीचे अप्रतिम डिझाईन्स असलेले दागिने, तसेच असंख्य डिझाईन्समध्ये चांदीच्या आकर्षक अ‍ॅक्सेसरीज उपलब्ध करून देत आहेत. याशिवाय, चांदीच्या दागिन्यांमध्ये आणि सेलिब्रेटी कलेक्शनमध्ये मुंबईचे रोपाशी ज्वेलर्स, अत्यंत बारकाईने तयार केलेले दागिने सादर करणार आहेत. तसेच, पुण्याचे गांधी ज्वेलर्स यांचे भव्य विवाह कलेक्शन आणि चांदीचे नावीन्यपूर्ण दागिने या प्रदर्शनात विशेष आकर्षण ठरणार आहेत.कोल्हापूरकरांच्या दागिन्यांच्या खरेदीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी आयोजित केलेल्या या भव्य प्रदर्शनाला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन आयोजक धर्मेश खेरगावकर यांनी केले आहे.

'गांधीनगरमधील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा'

गांधीनगर : बाजारपेठेतील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा व समान पाणी वाटपावरही उपाययोजना करावी, अशी मागणी शिवसेना (उबाठा) करवीरच्या वतीने ग्रामपंचायतीला केली. याबाबत बैठक घेऊ असे सरपंच संदीप पाटोळे, ग्रामविकास अधिकारी विजय पाटील यांनी सांगितले. यावेळी राजू यादव, जितेंद्र कुबडे, बाळासो नलवडे, वीरेंद्र भोपळे, दीपक पोपटानी उपस्थित होते.

मध्य रेल्वे

पुणे मंडळ

NIT No. DRM-W-PA-E-Tender-2026-S-23

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या करिता, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, पुणे यांच्याद्वारे खालील कामासाठी **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावरून खुली ई-निविदा मागविण्यात येत आहे :- S-23 - वरिष्ठ विभागीय अभियंता/दक्षिण/पुणे (Sr. DEN/S/PUNE) विभागांतर्गत लेव्हल क्रॉसिंग गेट्सवर रबराइज्ड पॅड बसविणे. **निविदेचा खर्च (Cost of NIT)** : ₹4,64,95,551.70/- **बयाणा रक्कम (Bid Security Cost)** : ₹ 9,29,900/- काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 (बारा) महिने आणि देखभाल कालावधी 06 (सहा) महिने आहे. टीप : I) वरील **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ :** 13.11.2026 रोजी 15:15 वाजेपर्यंत. II) इच्छुक निविदाकारांना विनंती आहे की त्यांनी निविदेच्या सविस्तर तपशीलासाठी **www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्यावी. III) निविदाकार वरील ई-निविदेमध्ये केवळ **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावरूनच इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सहभागी होऊ शकतात आणि ई-निविदेसाठी प्रत्यक्ष (मॅन्युअल) स्वरूपात दरपत्रक सादर करण्याची परवानगी नाही. प्रत्यक्ष (मॅन्युअल) स्वरूपात सादर केलेले दरपत्रक उघडले जाणार नाही तसेच ग्राह्य धरले जाणार नाही. IV) अधिक माहितीसाठी विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे) कार्यालय, मध्य रेल्वे, पुणे यांच्याशी 020-26059017 या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधू शकता. V) ज्या निविदाकारांना निविदा उघडण्याच्या वेळी उपस्थित राहायचे असेल, ते उपस्थित राहू शकतात. प्रत माहितीसाठी सूचना फलकावर.

SAN-43 — वि. रे. व्य. (कार्य), पुणे

अनधिकृतपणे रेल्वे रूळ ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे .



कोल्हापुरात उद्या मराठा वधू-वर मेळावा

कोल्हापूर : अखिल भारतीय मराठा महासंघ व जुना बुधवार तालीम मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठा वधू-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता जुना बुधवार तालीम मंडळ हॉल, जुना बुधवार पेठ, पन्हाळा रोड येथे मेळावा होईल. मेळाव्याला प्रमुख मार्गदर्शन राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक करणार आहेत. मेळाव्यात वधू-वर यांनी फोटो व बायोडेटासह उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष शशिकांत पाटील व तालीम अध्यक्ष रणजित शिंदे यांनी केले आहे.

सेवानिवृत्त अभियंत्यांचा उद्या मेळावा

कोल्हापूर : महाराष्ट्र राज्य, फोरम ऑफ रिटायर्ड डिप्लोमा इंजिनिअर्स संघटनेचा मेळावा शनिवारी (दि. २४) ताराबाई पार्क येथील एमएसईबी अभियंता विश्वेश्वर हॉलमध्ये आयोजित केला आहे. सकाळी १० ते दुपारी दोन या वेळेत होणाऱ्या मेळाव्यास नेपाळचे सार्क संघटनेचे अध्यक्ष इंजि. कामेश्वर प्रसादसिंग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

***कोल्हापूर :** क्षयरोगाविषयी जनजागृती करून 'क्षयरोगमुक्त भारत' अभियानात युवकांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने येथील एनसीसी भवनात जनजागृतीपर व्याख्यान व माहिती सत्र झाले. जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. हर्षला वेदक आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. तेजल जाधव यांनी क्षयरोगाबाबत मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

कल्पतरू पॉइंट, २, ३ आणि ४ था मजला, मूव्हीमॅक्स सिनेमा समोर, शीव सर्कल जवळ, शीव (पू), मुंबई - ४०० ०२२

Kalpataru Point, 2nd, 3rd and 4th floor, Opp. MovieMax Cinema, Near Sion Circle, Sion (E), Mumbai - 400 022

जाहीर सूचना

मा. मुंबई उच्च न्यायालयाने स्वतःहून दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. ०१/२०२६ मध्ये दिनांक २२/०९/२०२६ व १५/१०/२०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार, खालील निर्देश संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू राहतील.

१ रस्ते, मार्ग, गल्लया, पदपथ यांसह तत्सम सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यास संपूर्ण मनाई आहे.
२ रुग्णालये, शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालय व न्यायालयांपासून १०० मीटरच्या परिसरात (सर्व शांतता क्षेत्रात) फटाके फोडण्यास संपूर्ण मनाई आहे
३ ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या नियम ५-अ(२) नुसार आवाज करणारे फटाके रात्रीच्या वेळी (रात्री १०.०० ते सकाळी ६.००) कोठेही फोडण्यास मनाई आहे.
४ लेसर लाईट, उच्च तीव्रतेचे प्रकाश असणारे विद्युत दिवे आणि बीम लाईट्स ह्यांच्या वा उत्सव/मिरवणुकांमधील परावर संपूर्ण मनाई आहे.
५ कोणताही कार्यक्रम/मिरवणूक आयोजित केल्यास आवाजाची तीव्रता मोजणारी यंत्रे कार्यक्रमस्थळी/ मिरवणुकी सोबत ठेवणे बंधनकारक आहे.
६ खाजगी जागेतही आवाजाच्या विहित मर्यादांचे पालन करणे आवश्यक आहे.
७ कमी आवाज व कमी प्रदूषण करणारे हरित फटाके वापरावेत आणि नियमांनुसार विहित वेळेतच हे फटाके फोडावेत.
८ उपरोक्त निर्देशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०००, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६, भारतीय न्याय संहिता, २०२३ आणि स्फोटक पदार्थ अधिनियम, १८८४ अन्वये कारवाई करण्यात येईल.
९ फटाके फोडल्यामुळे सूक्ष्म कण, शिसे, बेरियम, स्ट्रॉन्शियम, तांब्याची संयुगे, कॅडमियम, अँटिमनी यांसारखे विषारी जड धातू आणि हानिकारक वायू वातावरणात मिसळतात तसेच अचानक तीव्र आवाज निर्माण होतो; यामुळे आधीच असलेल्या वायुप्रदूषणात भर पडते. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, श्वसन किंवा हृदयविकार असलेल्या व आजारी व्यक्ती आणि विद्यार्थ्यांना याचा सर्वाधिक त्रास होतो.
१० भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ५१अ(ग) नुसार पर्यावरणाचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे. त्यामुळे आवाज व धूर निर्माण करणारे फटाके फोडणे टाळावे आणि सण सुरक्षित, शांततापूर्ण व स्वच्छ पद्धतीने साजरे करावेत, असे आवाहन करण्यात येत आहे.
११ या सूचनेचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास MPCB हेल्पलाइनशी संपर्क साधावा:

Play Store: https://play.google.com/store/apps/details?id=com.maha.paryavaran (Maha Paryavaran App)
App Store: https://apps.apple.com/in/app/maha-paryavaran/id6746112134 (Maha Paryavaran App)

सदस्य सचिव
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
म्हाडा MHADA

जाहीर सूचना

दिनांक ०२/१२/२०१६ रोजी कोन, पनवेल येथील २४१७ सदनिकांसाठी झालेल्या सोडतीमधील यशस्वी गिरणी कामगार/वारस यांना सदनिकेचा ताबा घेण्याची शेवटची संधी

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक मुंबई मंडळ अंतर्गत सन २०१६ मध्ये कोन पनवेल येथे गिरणी कामगारांची २४१७ सदनिकांकरिता सोडत काढण्यात आली होती. परंतु त्यापैकी विविध कारणांस्तव अद्यापही आजतागायत एकूण १०८६ गिरणी कामगार/वारस यांनी सोडतीमधील घरांचा ताबा घेतलेला नाही. यास्तव मुंबई मंडळ (म्हाडा) मार्फत आवाहन केले जात आहे, की कोन पनवेल येथील घरांचा ताबा न घेतलेल्या एकूण १०८६ गिरणी कामगार/ वारस यांची यादी म्हाडाच्या **https://mhada.gov.in/en/lottery** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर यादीमधील गिरणी कामगार/ वारस यांनी दिनांक २६/१०/२०२६ ते दिनांक ०३/११/२०२६ या कालावधीत नागरीक सुविधा केंद्र, प्रवेशद्वार क्र.४, म्हाडा, कलानगर, वांद्रे (पूर्व) येथे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी विहित पुरावे/ कागदपत्रांसह प्रत्यक्ष निवेदन/ विनंती अर्ज सादर करावेत.

म्हाडाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेल्या कोन, पनवेल येथील सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या परंतू ताबा न घेतलेल्या यादीमधील गिरणी कामगार / वारसांनी वर दिलेल्या मुदतीत संपर्क न साधल्यास गिरणी कामगारांना दिल्या जाणाऱ्या घरकुल योजनेत आपणांस स्वारस्य नाही, असे गृहीत धरुन त्यांची कोन, पनवेल येथील सदनिका रद्द करण्यात येऊन त्यांचे प्राधान्य क्रमांकावर प्रतिक्षायादी कार्यान्वित करण्यात येईल. तसेच भविष्यात याबाबत त्यांच्या कोणत्याही विनंतीचा विचार करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. याबाबत मिल कामगारांचे परिजन/ मिल कामगार संघटना यांनी संबंधित मिल कामगार यांना जाहीर सूचनेबाबत आपल्या स्तरावर अवगत करुन सहकार्य करावे.

स्वाक्षरीत/-
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

CPRO/A/798





जाहीर समन्स

निशानी नंबर २८

प्रोसेस जमा र.रु..
दि. १२/१०/२०२६
अ‍ॅड. अरविंद रामराव देशमुख
वाणिज्य दावा नं. १/२०२०

इस्लामपूर येथील मे. जिल्हा दिवाणी न्यायाधीश सो, यांचे कोर्टात.....

सांगली जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि., सांगली तर्फे एम.बी.पाटील ———— वादी

विरुध्द

दालमिया भारत शुगर अँड इंडस्ट्रीज लि, वगैरे ३ ———— प्रतिवादी

प्रति,

प्रतिवादी नं. ३ महाराष्ट्र राज्य को-ऑप. बँक लि., मुंबई तर्फे कोल्हापूर बँकेचे अधिकृत ऑफिसर श्री. के. एस. चारबे रा. ऑफिस पत्ता आयोध्या टॉवर्स कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर

अपेलंट यांनी सदरचा दावा मे. जिल्हा दिवाणी न्यायाधीश सो, इस्लामपूर यांच्या कोर्टात यातील रिस्पॉडंट यांच्या विरुध्द सुट फॉर डिक्लेरेशन, इंन्जेक्शन अँड पजेशनसाठी दाखल केलेला आहे. सदर कामातील रिस्पॉडंट यांना त्यांचे कायमचे पत्ते ऑफिस पत्त्यावर दावा समन्स बजावणी करिता पाठविले असता सदर समन्स रिपोर्ट प्रमाणे सदर व्यक्तीचा शोध घेता त्याच्या मूळ पत्त्यावर नवीन पत्त्यावर आढळून होत नाही असे बेलीफ रिपोर्ट वरून समजुने आले आहे. परंतु त्यांच्या ठाव ठिकाणा उपलब्ध न झाल्याने सदर प्रतिवादी नं. ३ महाराष्ट्र राज्य को-ऑप. बँक लि, मुंबई तर्फे कोल्हापूर बँकेचे अधिकृत ऑफिसर श्री. के. एस. चारबे रा. ऑफिस पत्ता आयोध्या टॉवर्स कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांना जाहीर समन्सने कळविणेत येते की,

सबब सदरची जाहीर समन्स प्रसिध्द झाल्यापासून ४० दिवसांच्या आत किंवा नेमलेली तारीख दि. १७ / ११ / २०२६ रोजी ठिकाण १०.३० वाजता प्रतिवादी नं. ३ महाराष्ट्र राज्य को-ऑप. बँक लि., मुंबई तर्फे कोल्हापूर बँकेचे अधिकृत ऑफिसर श्री. के. एस. चारबे रा. ऑफिस पत्ता आयोध्या टॉवर्स कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांनी अगर आपल्या वकिलांमार्फत मे. कोर्टात हजर राहून आपली कैफियत सादर करावी अशा प्रकारे समन्स प्रसिध्द झाल्यानंतर आपण वरील नमूद तारखेपर्यंत आला नाही तर आपणास मे. कोर्टात दावा दाखल कामी काहीही सांगायचे नाही असे समजून तुमच्या विरुध्द एकतर्फा काम चालविणेत येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी. म्हणून ही जाहीर समन्स आज दि. १२/१०/२०२६ रोजी आपची सही निशा व मे. कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/- 'क' लिपीक (पी.ए.सूर्यवंशी) — शिक्का — सही/- अधीक्षक मा. सत्र न्यायालय, इस्लामपूर (आर.ए. हरिपूरकर)

मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना

नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ अंतर्गत

युनिमेटल कास्टींग्ज लिमिटेड (अवसायनात)

अवसायक : आयपी पंकज शाम जोशी, ९ सुदर्शन सीएचएस, महंत रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई-४०००५७

इथे सर्वसामान्य लोकांना सूचना देण्यात येते की भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ(अवसायन प्रक्रिया) नियम, २०१६च्या नियम १२(३) सह नियम ३३(१) नुसार, खाली नमूद करण्यात आलेल्या **युनिमेटल कास्टींग्ज लिमिटेड (अवसायनात)च्या मालमत्ता ई-लिलाव सेवा प्रदाते 'बांकनेट लिस्टींग अँड ऑक्शन पोर्टल'** (वेबसाईट https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi) यांच्याद्वारे आयोजित, ऑनलाईन ई-लिलाव प्रक्रियेद्वारे विकल्या जाणार आहेत. विक्री **'जे आहे जिथे आहे,' 'जे आहे ते आहे,' 'जे काही आहे तेथे आहे'** आणि 'सहाय्याशिवाय' बेसिसवर होणार आहे.

विक्रीसाठी असलेल्या मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन	राखीव मूल्य (भारतीय रू)	बयाणा रक्कम
सेक्टर एफ येथील जमीन आणि इमारत, पार्वती को-ऑपरेटीव्ह इंडस्ट्रीयल इस्टेट, सांगली रोड, गाव, इचलकरंजी, कोल्हापूर ४१६४१५ येथे प्लॉट क्र. ८२,८३,८४ आणि ८५, फेज-४, गट क्र. ६१ ते ६३ असलेली	९१,२८,४६५.००	९,१२,८४६.००

टीप १: बोली अर्ज आणि ई-लिलाव प्रक्रियेच्या तपशीलवार शर्ती आणि अटी समाविष्ट असलेले विक्री प्रक्रिया निवेदन https://ibbi.baanknet.com/eauctions-ibbi **वरून डाऊनलोड करून घेता येईल किंवा** pjoshi.ip@gmail.com वर ईमेलद्वारे विनंती करून मिळवता येईल. ई-लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक हे भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ(अवसायन प्रक्रिया) नियम, २०१६ (२२.०९.२०२६ पर्यंत झालेल्या सुधारणा)नुसार असून ते खाली दिले आहे.

लिलावाखाली असलेल्या मालमत्तांची योग्य तपासणी आणि पाहणी	२३.१०.२०२६ ते ०१.११.२०२६ सकाळी ११.०० ते सायं. ०५.०० (भारतीय प्रमाण वेळ)
ई-लिलाव व्यासपीठाच्या माध्यमातून पात्र बिडरद्वारे बयाणा रक्कम भरण्याचा अंतिम दिनांक	०२.११.२०२६
ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ	०४.११.२०२६ रोजी दुपारी १२.०० ते १३.००
सर्वोच्च बिडरची घोषणा	०५.११.२०२६

प्रस्तावित बिडर्सनी नादारी आणि दिवाळखोरी संहिता,२०१६ च्या कलम २९ अ अंतर्गत ते लागू होण्याच्या मर्यादेपर्यंत आपण कोणत्याही अपात्रतेने बाधित नाही आहोत, असे प्रतिज्ञापत्र प्रस्तुत करणे अनिवार्य आहे आणि जर कोणत्याही टप्प्यावर ते अपात्र असल्याचे आढळून आले, तर भरलेली बयाणा रक्कम जप्त केली जाईल. पाहणीसाठी ठरवलेल्या दिनांक रोजी किंवा त्यापूर्वी मालमत्तांच्या तपासणीसाठी कृपया खाली स्वाक्षरी करणारे यांना मोबाईल +९१ ९८२०४३६२६८, ई-मेल आयडी : pjoshi.ip@gmail.com वर संपर्क करा. मालमत्तांच्या ई-लिलावसंदर्भात अधिक स्पष्टीकरणासाठी कृपया बांकनेटशी +९१ ८२९१२ २०२२० वर किंवा ईमेल -support.baanknet@psballiance.com यावर संपर्क करा

स्वाक्षरी/- पंकज शाम जोशी
अवसायक युनिमेटल कास्टींग्ज लिमिटेड (अवसायनात)
नोंदणी क्र. IBBP/IPA-002/IP-N00507/2017-2018/11556
AA2/11556/02/311226/204161 31.12.2026 पर्यंत वैध

दिनांक: २३.१०.२०२६
ठिकाण : मुंबई

पुढारी **Classified** is Now Simplified... ऑनलाईन बुक करा... ऑनलाईन पेमेंट करा..!

छोजा Click फक्त एका क्लिकवर **classified.pudhari.news**

बोअरवेल

लाडा लक्ष्मी, लक्ष्मी, टेक्स्मो कंपनीचे बोअरवेल पंपसेट होलसेल दरात बसवून मिळतील. मो. ९८५०५०७६६३.

आरोग्य

दम्याच्या रुग्णांना सुवर्णसंधी ! गेल्या २३ वर्षांच्या परंपरेनुसार कोजागिरी पौर्णिमा दिनांक २५.१०.२०२६ रोजी जुनी सर्दी, खोकला व दमा (अस्थमा) यावर आयुर्वेदिक औषध दिले जाईल. तत्पूर्वी नांव नोंदणी आवश्यक. भेटा डॉ. सौ. स्वाती केतकर धन्वंतरी देशपांडे गल्ली, बेळगांव. फोन : ९४४८२ ६३२२३, ९९०२३ ८२९६८.

सजावट

सुलभ हप्त्यात साईसन किचन ट्रॉली, लॉफ्ट, काडाप्पा डोअर्स. एलआयसी ऑफिससमोर, लक्ष्मीपुरी/ उमा टॉकीज, के.एम.टी वर्कशॉपजेशारी. ९८२२०४४८४३.

विवाह

खानदानी मराठा उच्चशिक्षीत भरपूर स्थळे हेमा भोसले, कोल्हापूर. ९९२२९८५४५४ marathavivah.com

मराठा वधू- वर मेळावा शनिवार दि. २४ ऑक्टोबर स. ११वा जुना बुधवार पेठ, तालीम हॉल. संपर्क- ९९७५३८१८१८, ९४२३८६०३०२.

आस्था सेकंड मॅरेज पेठनाका नविन ग्राम पंचायतजवळ. मो. ९४०४६२३५०३. स्थळ सुचवल तरच फी.

श्रद्धा मराठा कोल्हापूर वर्षे २६ वे रेसकोर्स नाका, संभाजीनगर ७२७६४९८२८१ निव्वळ उच्चशिक्षीतासाठी शाखा: वारणा कोडोली दत्तमठी रोड.

पेस्ट कंट्रोल

इंडियन पेस्ट कंट्रोल - आयएसओ कंपनीतर्फे झुरळ, मुंगी, ढेकूण, वाळवीसाठी स्पेशल इंजे. ट्रिटमेंट. ९१७५९९५६१३

१००% लेखी गॅरंटी ! ढेकूण, झुरळ, वाळवी, डास इ.पासून मुक्तता. ढेकणांसाठी स्पेशल इंजेक्शन. निस्ट पेस्टो सोल्युशन्स - ९६८९१४५६७८, ९८८१९४५६७८, ९६९९६१११३४.

दीपावली

आकर्षक आकाश कंदिल, फॅन्सी पणती, हार, झेंडुलडी, फुलांचे व मण्यांचे तोरण, लाईटमाळा होलसेल दरात. सुमन आणि कंपनी, शिवाजी स्टेडियम, कोल्हापूर. ९३७००३३३६१.

वॉटर प्रुफिंग

४० वर्षे अनुभवी श्री वक्रतुंड वॉटरप्रुफिंग १००% गॅरंटी टेरेस, स्लॅब, बाथ. न फोडता, बेसमेंट, ओल. ९९६०५०५८१०, ७६२०४७१५२२.

डीएस वॉटरप्रुफींग ४५ वर्षे तज्ञ बाथरूम न फोडता, बेसमेंट, टेरेस, वॉटरटँक, कोबा, ग्रॉटींग. ९०७५०८४८९६.

श्री महालक्ष्मी वॉटरप्रुफींग- तोडफोड न होता बाथरूम, संडास, टेरेस, टँक, भिंतीला ओल कामे करू. ९०७५४९५१५५.

शेती

सर्व प्रकारचे ठिबकचे मटेरियल होलसेल दरात. १६ मीमी इनलाईन बंडल - १०००, पेप्सी ड्रीप- १५००, मल्चिंग बंडल- १६००, २० मीमी रेन पाईप- ४५०, ३२ मीमी रेन पाईप- ४८०. समर्थ सेल्स, जयसिंगपुर, मो. ७७७६८ ०७१११

बांधकाम

असेल तुमचा प्लॉट तर तुमच्या पसंतीनुसार बंगलो, घर, उत्तम दर्जाचे माल, मटेरीयलसह अनुभवी टीमकडून प्रती १७५० ते २४०० रू. प्रमाणे त्वरीत बांधून देवू व बिल्डिंग रिनोव्हेशनची कामे करू. ९९६०९३९५९५.


TIMES BUSINESS

THE TIMES OF INDIA, KOLHAPUR | FRIDAY, OCTOBER 23, 2026

Skills-Based Hiring Reshapes Entry-Level Roles

Skills-based hiring is becoming increasingly important for entry-level roles. By 2030, employers expect nearly one-third of core job skills to change, while 86% already rely extensively on skills-based hiring for entry-level recruitment. Graduates therefore need credible evidence of job-relevant capability that employers can assess quickly

Source: Coursera Micro Credentials Impact Report 2026, EY





Signals employers increasingly trust

Internships, portfolios, work samples and applied projects are among the strongest signals because they provide tangible evidence of how candidates approach problems and apply their skills in practice

Swiggy Q2 loss narrows on food delivery gains

Bengaluru: Swiggy reported a narrower second-quarter loss on Thursday, helped by improving profitability in its food delivery business, although the loss was higher than analysts had expected. The quick-commerce and food delivery firm posted a consolidated net loss of ₹922 crore for the quarter ended Sept 30, compared with a loss of ₹1,092 crore a year earlier. Analysts had expected a loss of ₹792 crore, according to data compiled by LSEG.

While the company's food delivery business reported a record adjusted core profit, losses at quick-commerce business Instamart, which delivers everything from phones to groceries, widened as Swiggy stepped up spending on pricing, customer acquisition and warehouse expansion. Swiggy's revenue from operations rose 36.1% year-on-year to ₹7,571 crore, beating analysts' estimate of ₹7,281 crore, according to LSEG data. REUTERS

crazy bosses



₹ snaps eight-day rally as oil climbs to highest since May

Crude Spike Rattles Currency Markets As Asian Stocks Slide

Mumbai: The rupee snapped an eight-session winning streak on Thursday as Brent crude prices climbed to their highest since May amid deepening concerns over conflict in West Asia, which also hammered global equities.

Rupee endured a volatile session, swinging from its strongest level in more than six weeks to close down 0.4% at 94.81 per dollar. Earlier in the day, chunky foreign inflows for Jio Platforms' IPO added to the tailwinds from the Reserve Bank of India's defensive measures, which had boosted the currency. However, its gains faded as oil prices climbed in the latter half of the session. Traders pointed to broad-based dollar demand in the domestic market, alongside wider signs of a risk-off move in global markets.

MSCI's All-World index was set for its biggest daily fall in two weeks, down 0.4%, as tech shares from Seoul and Tokyo to Amsterdam and Paris came under pressure. Equity futures also pointed to a weak start for Wall Street.

Oil prices remain a key risk

Oil prices have remained elevated despite Gulf oil flows holding up, reflecting market anxieties over the conflict.

"The sizeable risk premium currently embedded in prices is unlikely to fade until clear signs of de-escalation emerge and reassure investors that regional supply will remain uninterrupted," ING said in a note. Brent crude was last up 3.3% at $112.40 per barrel. India imports nearly 90% of its crude requirements. This remains a key risk for the rupee, with market participants and observers divided over how firmly the RBI should defend the currency in the face of fundamental pressures.

